RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-क

वर्ष ११, अंक ३०] मंगळवार, ऑगस्ट २६, २०२५/भाद्रपद ४, शके १९४७ [पृष्ठे ३३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई ४०० ००१, दिनांक २६ ऑगस्ट २०२५.

अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक पोउआ/अभियान/३०३५/२०२५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ३३ च्या पोट-कलम (१) चे खंड (ओ) आणि पोट-कलम (६) चे परंतुक याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई शासनाची पूर्व मंजुरी मिळाविल्यानंतर आणि असे नियम तात्काळ अंमलात आणणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल खात्री पटल्यावर, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :—

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रयुक्ती.- (१) या नियमांस, जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका (अपर पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रात) नियम, २०२५, असे म्हणावे.

(२) ते, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्राला लागू असतील.

(३) ते, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रात आयोजित करण्यात येणाऱ्या, -मग ते कोणत्याही नावाने संबोधले जात असो,- अशा सर्व जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे आंदोलन, मेळावे व मिरवणुका यांना लागू असतील:

परंतु, या नियमांच्या तरतुदी, शासकीय कार्यक्रम, पारंपरिक किंवा धार्मिक मिरवणुका, क्रीडा विषयक उपक्रम, शैक्षणिक जागृती कार्यक्रम, विवाह, अंत्यविधी, बदिस्त सभागृहातील कार्यक्रम आणि तत्सम उपक्रम यांना लागू असणार नाहीत.

२. व्याख्या.- (१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(एक) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२), असा आहे;

(दोन) "आंदोलन" याचा अर्थ, कोणत्याही राजकीय किंवा सामाजिक कारणासाठी किंवा सिद्धांतासाठी कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या गटाने जनतेसमोर युक्तिवाद, वादविवाद, सतत आग्रह किंवा जोरदार युक्तिवाद करून मार्गदर्शन करण्याची कृती किंवा प्रक्रिया, असा आहे;

(तीन) "पोलीस आयुक्त" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ७ च्या खंड (अ) अन्वये पोलीस आयुक्त म्हणून नियुक्त केलेला पोलीस अधिकारी, असा आहे;

(चार) "निदर्शने" याचा अर्थ, कोणत्याही सामाजिक, राजकीय किंवा सार्वजनिक धोरणात्मक मुद्द्यांकडे लक्ष वेधण्याच्या प्रयोजनांसाठी विचार व मते व्यक्त करण्याच्या किंवा त्यांच्या भावना, मते, श्रद्धा सार्वजनिकरित्या व्यक्त करण्याच्या किंवा धरणे आंदोलन करण्याच्या दृष्टीने, मार्ग, रस्ते, चौक, पदपथ किंवा रहदारीसाठी रचना केलेल्या इतर क्षेत्रांवर (पादचाऱ्यांसाठी, वाहनांसाठी किंवा अन्यथा) आयोजित केलेली संघटित केलेली जन चळवळ, असा आहे, आणि त्यात, उपरोक्त प्रयोजनासाठी अशा लोकांच्या सामुदायिक संमेलनाचा देखील समावेश होतो;

(पाच) "पदनिर्देशित अधिकारी' याचा अर्थ, विनिर्देशित क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या संबंधित पोलीस ठाण्याचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई हे, या बाबतीत नियुक्त करतील असा कोणताही अधिकारी, असा आहे;

(सहा) "धरणे" याचा अर्थ, मागणी मान्य होईपर्यंत संबंधित प्राधिकाऱ्याच्या दारात बसून किंवा गर्दी करून आणि आमरण उपोषण, बेकायदा प्रवेश, बैठे आंदोलन, इत्यादी विविध मार्गांचा वापर करून सक्तीने अनुपालन करवून घेण्याची किंवा न्याय मिळविण्याची पध्दती, असा आहे;

(सात) "मोर्चा" याचा अर्थ, एखादा विशिष्ट विचार, मागणी, हितसंबंध, मुद्दा किंवा राजकीय पक्ष यास पाठिंबा देण्यासाठी आयोजित केलेली मोठी जाहीर सभा किंवा पदयात्रा (अनेक लोकांनी आयोजित केलेली पदयात्रा), असा आहे;

(आठ) "बृहन्मुंबई महानगरपालिका" याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) अन्वये घटित केलेली बृहन्मुंबई महानगरपालिका, असा आहे;

(नऊ) "गोंगाट करणारे उपकरण" याचा अर्थ, ध्वनिक्षेपक, लाऊडहेलर, मेगाफोन, प्रवर्धक (ॲम्प्लिफायर), विद्युत किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल ध्वनिमुद्रक आणि परवानगी असलेल्या डेसिबलपेक्षा अधिक आवाजाचे कोणतेही पारंपरिक उपकरण, असा आहे, आणि त्यात त्यांचा समावेश होतो;

(दहा) "धरणे आंदोलन" याचा अर्थ, ज्या कार्यक्रमामध्ये एखादी व्यक्ती किंवा अधिक व्यक्ती, फलक(बॅनर), घोषणा, पत्रक किंवा इतर माध्यमांचा वापर करून सार्वजनिक ठिकाणी राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वरूपाच्या सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या विविध मुद्द्यांवर विचार व मते व्यक्त करतात, परंतु ज्यामध्ये कोणतीही भाषणे किंवा सार्वजनिक अभिभाषणे केली जात नाहीत, असा कार्यक्रम, असा आहे;

(अकरा) "जाहीर सभा" याचा अर्थ, सार्वजनिक हिताच्या बाबींवर किंवा विविध महत्त्वाच्या सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक बाबींवर चर्चा करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा त्यांचे विचार व्यक्त करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही सभा, संमेलन किंवा जन सभा, -मग ती निषेध किंवा आंदोलन किंवा मोर्चा, धरणे आंदोलन किंवा अन्यथा असो किंवा नसो, असा आहे; आणि त्यात त्यांचा समावेश होतो; परंतु, जेथे सर्वसामान्य जनतेला प्रवेशाचा करण्याचा किंवा कोणत्याही सद्‌भावपूर्वक धार्मिक सेवांचा हक्क नसतो अशा खाजगी जागेवर होणाऱ्या कोणत्याही जनसभेचा समावेश असणार नाही;

(बारा) "सार्वजनिक मिरवणूक" याचा अर्थ, सार्वजनिक ठिकाणी पादचाऱ्यांचा (पूर्णत: किंवा अंशत:) आणि सर्व प्रकारच्या वाहनांचा समावेश असलेला मोर्चा, धरणे आंदोलन किंवा मिरवणूक असा आहे आणि त्यात, त्यांचा समावेश होतो, परंतु त्यात सद्‌भावपूर्वक अंत्यविधी किंवा इतर धार्मिक मिरवणूक यांचा समावेश असणार नाही;

(तेरा) "रस्त्यावरील मेळावा" याचा अर्थ, कोणत्याही समस्येकडे लक्ष वेधण्याच्या प्रयोजनांसाठी किंवा जाहीर सभेसाठी पदपथावर अथवा रस्त्याच्या (मार्ग) रहदारी क्षेत्रावर, तरुपथावर, बहिर्दृश्य ठिकाणी किंवा चौकात लोकांच्या गटाची (एकतर मोटार वाहने, सायकली किंवा तीन चाकी सायकली यांसह किंवा त्याशिवाय) संघटित केलेली जन चळवळ, असा आहे आणि त्यात त्यांचा समावेश होतो.

(२) या नियमांत वापरलेले परंतु, त्यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीस प्रतिबंध अधिनियम, १९८४ (१९८४ चा ३), मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५०), महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ (१९९५ चा महा. ८), भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) किंवा, यथास्थिति, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) यांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ

असतील.

३. ठिकाणाची निश्चिती.- (१) रहिवाशांना, रहदारीला कमीत कमी अडथळा होण्याचे आणि विनियमित केलेल्या रीतीने निदर्शकांसाठी पुरेशी जागा उपलब्ध होण्याचे तत्व विचारात घेऊन, या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत धरणे, आंदोलने, संमेलने, सभा, निषेध, धरणे आंदोलने, मोर्चा, मिरवणुका, एकत्र जमणे, मेळावे, उपोषण किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचा निषेध करण्यासाठी पुढील ठिकाण हे "विनिर्देशित केलेले क्षेत्र" म्हणून विनिर्दिष्ट केले आहे:-

> " यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले, आझाद मैदान पोलीस ठाण्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रातील आझाद मैदान (भाग), मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयासमोर."

(२) वर नमूद केलेल्या विनिर्देशित क्षेत्राखेरीज, अतिरिक्त पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या क्षेत्रात कोणत्याही सार्वजनिक सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादींना मुभा असणार नाही.

(३) विनिर्देशित केलेल्या क्षेत्रातील कोणतीही जाहीर सभा, संमेलने, मोर्चा, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादींमध्ये सहभागी होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, पोलीस कोठडीत असलेली व्यक्ती म्हणून समजले जाणार नाही.

४. पदनिर्देशित अधिकाऱ्याची परवानगी.- (१) विनिर्देशित क्षेत्रात जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादी आयोजित किंवा आमंत्रित करू इच्छिणारी कोणतीही व्यक्ती, संघ किंवा संघटना, त्यासाठी अशी परवानगी मिळावी म्हणून, किमान सात दिवस अगोदर, **नमुना ब** मधील हमीपत्रासह, **नमुना अ** मध्ये नमूद केलेल्या पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(२) पदनिर्देशित अधिकारी, विनंती अर्ज प्राप्त झाल्यावर त्याची तपासणी करील आणि प्रस्तावित जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे व मिरवणुका, इत्यादींसाठी परवानगी द्यावी किंवा कसे याचा निर्णय घेईल. विनंती विचारात घेण्यात येईल आणि त्यानंतर एकतर, परवानगी

देण्यात येईल किंवा नाकारण्याची कारणे नमूद करून परवानगी नाकारण्यात येईल.

(३) पदनिर्देशित अधिकारी, पोट-नियम (२) अन्वये कोणतीही परवानगी देण्यापूर्वी, अशी खात्री करील की,-

(क) प्रस्तावित जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका इत्यादी, केंद्र सरकारने, राज्य शासनाने किंवा स्थानिक प्रशासनाने आयोजित केलेल्या इतर कार्यक्रमांशी किंवा पूर्वी परवानगी दिलेल्या सभा, मिरवणुका किंवा धरणे आंदोलने यांच्याशी एकरूप होणार नाहीत किंवा त्यांच्यामध्ये हस्तक्षेप करणारी नाहीत;

(ख) प्रस्तावित जाहीर सभा, संमेलने, मोर्चा, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे आणि मिरवणुका, इत्यादी अपेक्षित वेळेत व ठिकाणी आयोजित केल्यामुळे वाहनांच्या किंवा पादचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी लक्षणीय समस्या निर्माण होणार नाहीत.

(४) प्रस्तावित जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादी नियोजित वेळेत, ठिकाणी आणि स्वरूपात आयोजित केल्यामुळे, इतरांचे हक्क धोक्यात येणार नाहीत.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिका, विनिर्देशित क्षेत्रामध्ये निषेध करणाऱ्यांसाठी वैद्यकीय सेवा, प्रसाधनगृहे, मुतारी व पिण्याचे पाणी पूरवील.

(६) अर्ज विचारात घेण्याची प्रक्रिया:-

(क) अशी परवानगी मागणारा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पदनिर्देशित अधिकारी, तो अर्ज,सूचना मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत त्यांचे आक्षेप, कोणतेही असल्यास, मागविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका, अग्निसुरक्षा अधिकारी, इत्यादींसह सर्व संबंधित प्राधिकाऱ्यांकडे पाठवू शकेल.

(ख) "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्त्वानुसार परवानगी देण्यात येईल. पदनिर्देशित अधिकारी, सभा परस्परव्याप्त होण्याचे टाळता यावे म्हणून जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादींच्या तारखा, वेळ, ठिकाण आणि आयोजक यांच्या तपशील असलेली एक दिनदर्शिका ठेवील.

(ग) पदनिर्देशित अधिकाऱ्याने दिलेल्या प्रत्येक परवानगीमध्ये, विनिर्दिष्ट व अनिवार्य अटी व

शर्तीचा समावेश असेल. पदनिर्देशित अधिकाऱ्याला, सार्वजनिक सुरक्षा, शांतता व प्रशांततेच्या हितार्थ त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे अशा कोणत्याही विनंतीवर कोणत्याही आणखी शर्ती समाविष्ट करण्याचे स्वातंत्र्य असेल.

(घ) पदनिर्देशित अधिकारी, राज्य विधिमंडळाची अधिवेशने, अतिमहत्त्वाच्या व्यक्ती किंवा महत्त्वाच्या व्यक्ती यांचे दौरे, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, महत्त्वाचे शासकीय कार्यक्रम, शासकीय उत्सवाचे दिवस व नवीन वर्ष साजरे करणे, इत्यादी कालावधीत आणि वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर दिवशी परवानगी देण्यास नकार देऊ शकेल.

(ङ) पदनिर्देशित अधिकाऱ्याला महत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेची निकड किंवा इतर कोणतीही गुप्तवार्ता माहिती यांसारख्या अनपेक्षित व आकस्मिक प्रसंगी परवानगी रद्द करण्याचे स्वातंत्र्य असेल. असे रद्द करण्याची कारणे लेखी स्वरूपात नोंदविण्यात येतील आणि आयोजकांना कळविण्यात येतील.

(च) आंदोलनांस एका वेळी फक्त एका दिवसासाठी आणि केवळ शासकीय कामकाजाच्या दिवशी परवानगी देण्यात येईल. शनिवार, रविवार व शासकीय किंवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कोणत्याही परवानग्या देण्यात येणार नाहीत.

(छ) पदनिर्देशित अधिकाऱ्याला, ज्या व्यक्तीला (व्यक्तींना) किंवा व्यक्तींच्या ज्या संघाला अशी परवानगी देण्यात आली आहे, त्यांचे नाव किंवा नावे विनिर्दिष्ट करण्याचे स्वातंत्र्य असेल.

(ज) जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवरील पदनिर्देशित अधिकाऱ्याचा निर्णय, अंतिम असेल आणि तो आयोजकांवर बंधनकारक असेल.

५. निदर्शकांच्या वाहनांना प्रवेश व वाहनतळ.- सार्वजनिक सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादींशी संबंधित असलेल्या ठिकाणी निदर्शकांची वाहने व वाहनतळे यासंबंधात पुढील शर्ती लागू असतील:-

(क) वाहनतळासाठी (जर अशी जागा उपलब्ध असेल तर) वाहतूक पोलीसांशी विचारविनिमय

करून परवानगी देता येईल.

(ख) ट्रॅक्टर्स, ट्रॉलीज, बैलगाड्या, सायकल रिक्षा किंवा हातगाड्या, मालवाहतुकीची किंवा जड वाहने यांना परवानगी असणार नाही.

(ग) घोडे, हत्ती, उंट, गुरे, कोंबड्या इत्यादींसारखे प्राणी किंवा पक्षी, इत्यादींना सार्वजनिक सभा, संमेलने, मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादींमध्ये परवानगी असणार नाही.

६. निदर्शकांच्या एकूण संख्येवर निर्बंध घालणे.- (१) विनिर्देशित क्षेत्रामध्ये परवानगी दिलेल्या निदर्शकांची संख्या, पाच हजार इतकी असेल.

(२) योग्य वेळेच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, एकाच दिवशी वेगवेगळी निदर्शने करण्यास परवानगी देता येईल.

(३) नमुना अ नुसार हमीपत्रात नमूद केलेल्या संख्येपेक्षा अधिक संख्येने निदर्शक आणणारा कोणताही आयोजक, या नियमांन्वये दिलेल्या परवानगीचे उल्लंघन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असल्याचे मानण्यात येईल. असे आयोजक व असे निदर्शक कठोर कायदेशीर कारवाईस आणि याबाबतीत कायद्यानुसार परवानगी असलेल्या परिणामांना जबाबदार असतील आणि पदनिर्देशित अधिकाऱ्याला, अशा आयोजकांनी किंवा निदर्शकांनी भविष्यात केलेला कोणताही अर्ज नाकारण्याचे स्वातंत्र्य देखील असेल.

७. विनिर्देशित केलेल्या क्षेत्राच्या दिशेने आणि क्षेत्राकडून मोर्चा नेला जाणार नाही.- विनिर्देशित क्षेत्राच्या दिशेने आणि क्षेत्राकडून मोर्चा नेण्यास परवानगी असणार नाही. आयोजकाने याची खात्री केली पाहिजे की, निषेध करणारे किंवा निदर्शक, नियमित रहदारी व पादचाऱ्यांची ये-जा यांस अडथळा न येता आणि कोणत्याही प्रकारची निदर्शने, घोषणाबाजी किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारची अशांतता निर्माण न करता केवळ विनिर्देशित केलेल्या क्षेत्रातून शांतपणे एकत्र येतील तसेच पांगतील.

८. ध्वनिक्षेपक व गोंगाट करणाऱ्या इतर उपकरणांचा वापर.- (१) पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट परवानगी घेतल्याशिवाय, जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादी ठिकाणी ध्वनिक्षेपक, सार्वजनिक प्रचार यंत्रणा किंवा गोंगाट करणारी उपकरणे

यांचा वापर करण्यात येणार नाही.

(२) जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने अशी परवानगी दिली असेल त्याबाबतीत, ध्वनिक्षेपकांस किंवा गोंगाट करणाऱ्या उपकरणांना पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९) अन्वये केलेल्या ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २०२० नुसार परवानगी दिलेल्या डेसिबल मर्यादेच्या आतच परवानगी असेल.

९. तंबू व तात्पुरत्या संरचना उभारण्यास निर्बंध.- निदर्शकांना, विनिर्देशित क्षेत्रामध्ये तात्पुरत्या कालावधीसाठी देखील तंबू व तात्पुरत्या संरचना उभारण्यास परवानगी देण्यात येणार नाही. तथापि, अपवादात्मक परिस्थितीमध्ये, पदनिर्देशित अधिकारी, पदनिर्देशित अधिकाऱ्याने, वेळोवेळी, निर्देशित केल्याप्रमाणे तंबू टाकण्याच्या आणि बांधण्याच्या मानकांचे कडक अनुपालन करण्यास अधीन राहून, तात्पुरते तंबू किंवा व्यासपीठ उभारण्याची परवानगी देऊ शकेल.

१०. वेळेवरील निर्बंध.- या नियमाखालील सर्व परवानग्या, फक्त सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० याच वेळेसाठी देण्यात येतील. विनिर्देशित क्षेत्र, सायंकाळी ६.०० पासून सकाळी ९.०० पर्यंत रिकामे करण्यात येईल सायंकाळी ६.०० नंतर आणि सकाळी ९.०० पूर्वी कोणतीही व्यक्ती विनिर्देशित क्षेत्रामध्ये आढळल्यास, ती, अंमलात असलेल्या व लागू असलेल्या कायद्यान्वये अनुज्ञेय असेल अशा मर्यादेपर्यंत द्रव्यदंडाच्या आणि/ किंवा कारावासाच्या शिक्षेसाठी पात्र असेल.

११. मनाई.- कोणत्याही जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादींदरम्यान पुढील कृत्यांना सक्त मनाई असेल:-

(क) सहभागी व्यक्तींना, लाठ्या, अग्निशस्त्रे, भाले, तलवारी किंवा आक्रमणकारी हत्यार म्हणून वापरता येऊ शकतील अशा कोणत्याही वस्तू बाळगता येणार नाहीत.

(ख) विनिर्देशित क्षेत्रामध्ये कोणताही वायू, शस्त्रे, स्फोटक पदार्थ, विषारी पदार्थ, ज्वलनशील पदार्थ आणि / किंवा वाहन आणण्यास परवानगी असणार नाही;

(ग) सहभागी व्यक्तींना, काठ्यांना लावलेले झेंडे व फलक (बॅनर) बाळगता येतील, परंतु ते केवळ प्रदर्शनासाठी असतील. आयोजकांनी याची खात्री केली पाहिजे की, झेंडे किंवा फलकांचा (बॅनरचा) आकार नऊ फूट x सहा फुटांपेक्षा अधिक असणार नाही आणि फलकांसाठी किंवा झेंड्यांसाठी

वापरलेली कोणतीही काठी, दोन फूटांपेक्षा अधिक लांबीची असणार नाही. कार्यक्रमात, इतर व्यक्तींच्या किंवा समुदायाच्या भावना दुखावतील असे आक्षेपार्ह घोषणा फलक किंवा फलक (बॅनर) यांचे प्रदर्शन केले जाणार नाही.

(घ) शिवीगाळ करणे किंवा चिथावणीखोर भाषणे करणे, आक्षेपार्ह चलचित्रण किंवा ध्वनीमुद्रण करणे आणि ते समाज माध्यमातून किंवा इतर कोणत्याही प्रकारे प्रसारित करणे यांसारख्या कोणत्याही कृत्यांना परवानगी दिली जाणार नाही. कोणतीही सहभागी व्यक्ती, धर्म, वंश, स्थान, जन्म, निवासस्थान, भाषा, इत्यादी कारणांवरून जमावाच्या भावना भडकवण्याचा किंवा त्यांना चिथावणी देण्याचा किंवा वेगवेगळ्या गटांमध्ये शत्रुत्व वाढविण्याचा संभव असलेल्या कोणत्याही भाषेचा वापर करणार नाही किंवा अशा गटांमध्ये सलोखा राखण्यास कोणत्याही रीतीने बाधा होईल अथवा सार्वजनिक शांतता व प्रशांतता बिघडेल अशी कोणतीही कृती करणार नाही.

(ड.) सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती, आत्मदहनाचा प्रयत्न करणार नाही किंवा आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणार नाही किंवा उपोषण करणार नाही अथवा ज्यामुळे, एकतर अशा सहभागी झालेल्या व्यक्तीच्या किंवा इतर कोणाच्याही जीवाला किंवा अवयवांना धोका निर्माण होईल असे कोणतेही पाऊल उचलणार नाही.

(च) सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होईल, सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला करण्यात येईल, जाळपोळ, इत्यादी करण्यात येईल अशी कोणतीही कृती करणार नाही. जर असे कोणतेही नुकसान झाल्यास, त्याच्या दुरुस्तीचा व पुनःस्थापनेचा खर्च प्रचलित कायदेशीर तरतुदींनुसार अशा आयोजकांकडून किंवा सहभागी व्यक्तींकडून वसूल करण्यात येईल.

(छ) सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती, विनिर्देशित क्षेत्रात कोणतीही कागदपत्रे, पुस्तके, पुतळा, इत्यादी जाळणार नाही.

(ज) सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती, विनिर्देशित क्षेत्रात कोणतेही अन्न शिजवणार नाही किंवा केरकचरा टाकणार नाही.

(झ) विनिर्देशित क्षेत्रात जमलेल्या किंवा सहभागी झालेल्या सर्व व्यक्ती, संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत ती जागा शांततेत रिकामी करतील.

(ञ) विनिर्देशित क्षेत्रामधील मिरवणुकीच्या बाबतीत, पदनिर्देशित अधिकाऱ्याला ज्या मार्गावरून व ज्या वेळी अशी मिरवणूक जाईल तो मार्ग व ती वेळ यासंबंधातील अशा शर्ती व निर्बंध आणि त्याला लादणे योग्य वाटेल अशा इतर शर्ती लादण्याचे स्वातंत्र्य असेल.

(ट) सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती, वाहतूक मार्गावर व पदपथावर जमणार नाही किंवा तो अडवणार नाही.

१२. आयोजकाची जबाबदारी.- (क) या नियमांच्या तरतुदींन्वये ज्याला परवानगी देण्यात आलेली आहे अशी प्रत्येक व्यक्ती किंवा संघ, पदनिर्देशित अधिकारी याबाबतीत लादील अशा, परवानगीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शर्तींचे यथोचित पालन करण्यास जबाबदार असेल. ज्या अटी व शर्तींवर उक्त परवानगी देण्यात आली आहे, त्या अटी व शर्तींपैकी कोणत्याही अटींचा व शर्तींचा भंग किंवा उल्लंघन झाल्यास, ज्या व्यक्तीला किंवा संघाला परवानगी देण्यात आली असेल आणि जी व्यक्ती जमावाची सदस्य होती अशी प्रत्येक व्यक्ती किंवा संघटना या अधिनियमाच्या आणि भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याच्या संबंधित तरतुदींअन्वये त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यास पात्र असतील.

(ख) आयोजक, सार्वजनिक प्राधिकरणाशी समन्वय साधून काम करील आणि प्राधिकाऱ्यांना सर्व परिस्थितीत सहकार्य करील.

(ग) वर नमूद केल्याप्रमाणे, आयोजक विनिर्देशित क्षेत्रातील सहभागी व्यक्तींची कमाल संख्या, नमुना अ मध्ये नमूद केलेल्या सहभागी व्यक्तींच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही याची खात्री करील.

(घ) कार्यक्रमाचे आयोजक, व्यवस्थापक, व्यवस्थापकाचे सहायक आणि सुव्यवस्था राखणाऱ्या व्यक्ती, संपूर्ण कार्यक्रमादरम्यान विनिर्देशित क्षेत्रात उपस्थित राहतील.

(ङ) आयोजकास, ज्या व्यक्ती त्यांच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यासाठी उपलब्ध असलेल्या संबंधित शासकीय प्राधिकाऱ्यांकडे किंवा कार्यालयात घेऊन जाऊ शकतील अशा जास्तीत जास्त पाच व्यक्तींचे प्रतिनिधिमंडळ तयार करता येईल.

(च) जर निदर्शकांनी, या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केले आणि आयोजकांच्या सूचनांचे पालन केले नाही तर, आयोजक, एकतर कार्यक्रम बंद केल्याचे घोषित करील किंवा सुव्यवस्था पूर्ववत करण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांकडे किंवा स्थानिक शासनाच्या प्रतिनिधीकडे जाईल.

(छ) जर कार्यक्रमाचे निदर्शक, पोलीस कर्मचाऱ्यांनी किंवा स्थानिक शासनाच्या प्रतिनिधीने या नियमांच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्याबाबत दिलेल्या सूचनांचे पालन करीत नसतील तर, पोलीस कर्मचारी किंवा स्थानिक शासनाचा प्रतिनिधी, कार्यक्रम बंद करण्यात आल्याचे घोषित करील, किंवा त्यात सहभागी झालेल्या व्यक्तींना कार्यक्रमाचे विनिर्देशित क्षेत्र सोडून जाण्याची मागणी करील आणि त्यानंतर, निदर्शकांविरुद्ध लागू असलेल्या अधिनियमान्वये अनुज्ञेय असेल अशी कायदेशीर कारवाई करील.

१३. पदनिर्देशित अधिकाऱ्याचे अधिकार.- पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, या नियमांच्या नियम ४ च्या तरतुदींनुसार, ज्यांना परवानगी देण्यात आलेली नाही किंवा ज्यामध्ये अशा प्रकारे देण्यात आलेल्या परवानगीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन होत आहे, अथवा या नियमांनुसार दिलेल्या आदेशाचे किंवा अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून, किंवा इतर कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून बोलावण्यात आलेली किंवा घेण्यात येत असलेली अशी कोणतीही जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादी थांबविता येतील आणि अशी मिरवणूक पांगवण्याचा आदेश देता येईल. अशा प्रसंगी, पदनिर्देशित अधिकाऱ्यास, सहभागी व्यक्तींना विनिर्देशित क्षेत्रातून आणि अन्य सभोवतालच्या क्षेत्रांतून बाहेर काढण्यासाठी आवश्यक बळाचा वापर करता येईल.

१४. कार्यक्रमानंतरच्या उपाययोजना.- सार्वजनिक सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादी समाप्त झाल्यानंतर सर्व संबंधित शासकीय अभिकरणे पुढील उपाययोजनांची सुनिश्चिती करतील:-

(क) स्वच्छता मोहीम हाती घेणे आणि लवकरात लवकर पूर्ववत करणे:

(ख) पर्यावरणाचे किंवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्यास, आयोजकाकडून प्रचलित कायदेशीर तरतुदींनुसार, नुकसान भरपाई वसूल करणे; आणि

(ग) वरीलप्रमाणे कोणतेही उल्लंघन झाल्याच्या बाबतीत, सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीस प्रतिबंध अधिनियम, १९८४ (१९८४ चा ३) अन्वये असलेली मात्र त्यापुरती सीमित नसलेली आवश्यक कायदेशीर कारवाई सुरू करण्यात येईल.

अनुसूची

(नियम ३ पहा)

आझाद मैदानातील विनिर्देशित केलेल्या क्षेत्राचे स्थान

आझाद मैदानावर नेमून दिलेले क्षेत्र :

क. पश्चिम दिशेला : मुंबई जिमखान्याचे मैदान ;

ख. पूर्व दिशेला : बृहन्मुंबई महानगरपालिका;

ग. दक्षिण दिशेला : हजारीमल सोमाणी मार्ग;

घ. उत्तर दिशेला : मेट्रो रेल्वे प्रकल्प क्षेत्र.



अक्षवृत्त :- १८.९३९४२८° **रेखावृत्त :- ७२.८३२६७७°**

नमुना अ

(नियम ४ (१) पहा)

जाहीर सभा / मिरवणूक / धरणे / निदर्शन, इत्यादीसाठी परवानगी मिळण्याचा अर्ज.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव ....

२. अर्जदाराचा पत्ता ....

३. .... च्या वतीने केलेला अर्ज (स्वतः किंवा संघटना)

४. जाहीर सभा आणि / किंवा सार्वजनिक मिरवणूक, इत्यादीकरिता हवी आहे किंवा कसे.

५. .... (वाजता) सुरू होईल ......(वाजता) समाप्त होईल.

६. सभा असल्यास, सभेचे ठिकाण.........................

७. मिरवणूक असल्यास, एकत्र जमण्याच्या ठिकाणाचे, मार्गाचे व सभा विसर्जित होण्याच्या ठिकाणाचे वर्णन................................

८. सभेत / मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या व्यक्तींची व वाहनांची कमाल संख्या.....................

९. सभेत / मिरवणुकीत, बँड, ध्वनिक्षेपक, फलक (बॅनर), घोषणाफलक, निशाणी किंवा ध्वज वापरण्याची इच्छा असल्यास, त्याचा तपशील................................

१०. सभा / मिरवणूक आयोजित करणाऱ्या व आयोजित करण्यास सहाय्य करणाऱ्या व्यक्तींची नावे......

११. जाहीर सभेचे / मिरवणुकीचे कारण........................

१२. संबंधित शासकीय विभाग (कोणतेही असल्यास)

दिनांक:- ....

....

(अर्जदाराची स्वाक्षरी)

नमुना ब

(नियम ४ (१) पहा)

आयोजकाचे हमीपत्र

कार्यक्रमाचा दिनांक..................
जाहीर सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका, इत्यादींचे स्थळ............
वेळ.......तास ते....... तासापर्यंत..........
सहभागी होणाऱ्यांची संख्या..................
स्वयंसेवकांची संख्या......................

मी, ...(आयोजकांचे नाव व पदनाम)......................... (संघटनेचे नाव) या संघटनेचा आयोजक याद्वारे, असे हमीपत्र देतो की, ... या दिवशी धरणे / निदर्शने करण्यासाठी प्रतिनिधी म्हणून संघटनेने मला प्राधिकृत केले आहे. मी अशी हमी देतो की, मी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२), जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका (अपर पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रांत) नियम, २०२५ आणि पुढील अटी व शर्ती यांचे पालन करील :-

१. मी, कर्तव्यावर असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने मागणी केल्यावर, त्यास दाखवण्यासाठी दिलेली परवानगीची मूळ प्रत सोबत बाळगील.

२. मी, जिच्याशी पोलीस संपर्क करू शकतील अशा, ... जबाबदार व्यक्तीची (आयोजकाने प्रतिनियुक्त केलेल्या संपर्क व्यक्तीचे नाव, पदनाम व दूरध्वनी क्रमांक) प्रतिनियुक्ती करील.

३. मी, नागरी/स्थानिक स्वराज्य संस्थांशी विचारविनिमय करून, पिण्याचे पाणी (टँकरद्वारे पुरवठा करून) व प्रथमोपचार / वैद्यकीय मदत यांची देखील सभा स्थळी आणि धरणे / निदर्शन कालावधीत

पर्याप्त व्यवस्था करील.

४. मी व इतर आयोजक याची खात्री करतील की, धरणे, निदर्शने, इत्यादी सुव्यवस्थितरीतीने करण्यात येईल आणि वाहतुकीच्या सामान्य ओघामध्ये अडथळा आणणार नाही आणि वाहनतळ व वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यात येईल.

५. मी व इतर व्यक्ती, धरणे, निदर्शने, इत्यादींमध्ये सहभागी होणाऱ्यांची मर्यादा, माझ्या निवेदनात विनिर्दिष्ट केलेल्या संख्येपर्यंतच मर्यादित ठेवील आणि कोणत्याही परिस्थितीत त्यात वाढ होऊ देणार नाही.

६. मी, व इतर आयोजक याची खात्री करतील की, पोलिसांना सहाय्य करण्यासाठी पुरेशा संख्येतील स्वयंसेवकांना त्या स्थळी व त्या स्थळाभोवती तैनात करण्यात येईल आणि तसेच संपर्काच्या तपशीलासह स्वयंसेवकांची यादी आगाऊ स्वरुपात पोलिसांना पुरवील.

७. मी व इतर आयोजक याची खात्री करतील की, धरणे, निदर्शन, सभा, इत्यादी, विहित ठिकाणी / स्थळीच घेण्यात येईल.

८. मी व इतर आयोजक याची खात्री करतील की, धरणे, निदर्शन, इत्यादी विहित कालावधीत, म्हणजेच सकाळी ९:३० ते सायंकाळी ५:३०. या वेळेत घेण्यात येईल.

९. मी व इतर आयोजक, ध्वजांसाठी / फलकांसाठी २ फुटांपेक्षा अधिक लांबीची काठी वापरणार नाही. ध्वजाचा / फलकाचा आकार ९ फूट × ६ फूट किंवा त्यापेक्षा कमी असे असेल. सहभाग घेणाऱ्या व्यक्ती, काठीवरील ध्वज / फलक, इत्यादी केवळ प्रदर्शनाच्या हेतूनेच जवळ बाळगतील.

१०. मी, व इतर आयोजक याची खात्री करतील की, धरणे, निदर्शने, इत्यादींमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्ती, आक्रमणकारी हत्यार म्हणून वापरले जाण्याचा संभाव असतील अशा लाठ्या, अग्निशस्त्रे, भाले, तलवारी व इतर वस्तू जवळ बाळगणार नाहीत. मी याची खात्री करील की, सहभागी होणारी कोणतीही व्यक्ती, ज्यामुळे मानवी जीवितास किंवा त्याच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा सार्वजनिक शांतता भंग होईल किंवा दंगा उसळेल असे कोणतेही नकली अग्निशस्त्र किंवा इतर कोणतेही अग्निशस्त्र जवळ बाळगणार नाहीत.

११. मी, व इतर आयोजक, याची खात्री करतील की, सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती,

चिथावणीखोर भाषणे करणार नाही किंवा जमावाच्या भावना भडकवणारी किंवा त्यांना चिथावणी देणारी किंवा विविध गटांमध्ये धर्म, वंश, स्थान किंवा जन्म, निवास, भाषा, इत्यादी कारणावरून शत्रुत्व निर्माण करणारी किंवा तसा संभव असणारी भाषा वापरणार नाही अथवा अशा गटांमधील सलोखा राखण्यास बाधक ठरणारी किंवा सार्वजनिक प्रशांतता बिघडविणारी अशी कोणतीही कृती कोणत्याही रीतीने करणार नाही.

१२. मी, व इतर आयोजक याची खात्री करतील की, धरणे, निदर्शने, इत्यादींमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्ती, पोलीस आयुक्त, मुंबई यांनी किंवा कर्तव्यावर असलेल्या इतर कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने, मेळावा किंवा धरणे / निदर्शने, इत्यादीच्या कोणत्याही टप्प्यावर दिलेल्या सर्व कायदेशीर निदेशांचे तात्काळ अनुपालन करतील.

१३. मी, व इतर आयोजक याची खात्री करतील की, सहभागी होणारी कोणतीही व्यक्ती, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होईल, शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यात येईल किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण होईल, जाळपोळ, इत्यादी होईल अशा रीतीने कोणतीही कृती करणार नाही किंवा इतर कायद्याचे उल्लंघन होईल अशी कोणतीही गोष्ट करणार नाही.

१४. मी, व इतर आयोजक अशी खात्री करतील की, सहभागी होणारी कोणतीही व्यक्ती, ज्यामुळे कोणत्याही धर्माचा किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तींचा अपमान होईल या उद्देशाने कोणतेही प्रार्थनास्थळ किंवा व्यक्तींच्या कोणत्याही वर्गाने पवित्र मानलेली कोणतीही वस्तू नष्ट करणार नाही, तिचे नुकसान करणार किंवा ती अपवित्र करणार नाही.

१५. मी, व इतर आयोजक, धरण्याच्या, निदर्शनाच्या विहित ठिकाणावरून कूच करण्याच्या अविर्भावात जाणार नाही. या कालावधीत, मी व इतर आयोजक, पोलिसांच्या सूचनांचे / निदेशांचे अनुपालन करू.

१६. मी, व इतर आयोजक, कोणत्याही प्रकारची कागदपत्रे, पुस्तके व प्रतिमा जाळणार नाही आणि अन्न शिजवण्यास, कचरा करण्यास घोषणा फलक, फलक, प्लास्टिक कचरा फेकण्यास प्रोत्साहन देणार नाही.

१७. मी, व इतर आयोजक, याची खात्री करतील की, विनिर्दिष्ट परवानगीशिवाय, धरणे, निदर्शन

स्थळी ध्वनिक्षेपकाचा किंवा जनसंबोधन यंत्रणेचा वापर करण्यात येणार नाही आणि ज्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याने परवानगी दिलेली असेल अशा सकाळी ९:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेतच केवळ ध्वनिक्षेपक वापरण्यात येईल.

१८. मी, व इतर आयोजक अशी खात्री करतील की, ट्रॅक्टर, ढकलगाडी (ट्रॉली), बैलगाडी, सायकल-रिक्षा, हातगाडी यांसह कोणतीही वाहने किंवा पक्षी, घोडे, हत्ती, उंट, कोंबड्या, इत्यादींसारखे प्राणी धरणे, निदर्शने, इत्यादी ठिकाणी आणली जाणार नाहीत.

१९. मी, अनुयायांना नियंत्रणाखाली ठेवण्यास जबाबदार असेल, त्यात निष्फळ ठरल्यास, माझ्यासह इतर आयोजकांवर विद्यमान कायद्याच्या तरतुदींन्वये खटला दाखल करण्यात येईल.

२०. मी व इतर आयोजक, हमीपत्रातील मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करतील आणि पोलीसांना, सर्व परिस्थितीत सहकार्य करतील.

दिनांक ....

ठिकाण ....

....

(स्वाक्षरी)

.... (मोठ्या वर्णात नाव)

.... (पदनाम)

.... (संघटनेचे नाव)

भ्रमणध्वनी क्रमांक. ....

इतर कोणताही दूरध्वनी क्रमांक. ....

पोलीस आयुक्त,

बृहन्मुंबई.

THE COMMISSIONER OF POLICE, BRIHAN MUMBAI

Opposite Crawford Market, Mumbai 400 001, dated the 26th August 2025.

NOTIFICATION

MAHARASHTRA POLICE ACT.

No. पोउआ/अभियान/३०३५/२०२५.—Whereas, the Commissioner of Brihan Mumbai in exercise of the powers conferred by clause (o) of sub-section (*1*) and the proviso to sub-section (*6*) of section 33 of the Maharashtra Police Act and of all other powers enabling him in that behalf, being satisfied that circumstances exist which render it necessary that such rules be brought into force at once hereby makes the following rules, namely :—

1. *Short title, extent and application.—*

(i) These rules may be called the Public meetings, agitations and processions Rules, 2025.

(ii) It extends within the territorial jurisdiction of Additional Commissioner of Police, South Region, Mumbai.

(iii) It shall apply to all Public Meetings, Gatherings, Morchas, Agitations, Demonstrations, Dharnas, Rallies and Processions, by

whatever name called to be conducted within the jurisdiction of Additional Commissioner of Police, South Region, Mumbai :

Provided that the provisions of these rules shall not apply to Government functions, Traditional or Religious processions, Sports activities, Educational awareness programs, Marriages, funerals, Indoor functions and such similar activites.

2. *Definitions.*—In these rules, unless the context otherwise requires,—

